# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : १५ जानेवारी २०१९

## ( बैठक क्र. २०७ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | ओबीसी आणि भटक्या-विमुक्त जातींच्या विकासासाठी मंत्रिमंडळाचे विविध निर्णय | विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण (एकूण ५ निर्णय एकत्रित स्वरुपात) |
| २ | इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थिनींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना | विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण |
| ३ | ओबीसींमधील १० वी आणि १२ वीच्या गुणवंतांचा स्व. वसंतराव नाईक पुरस्काराने गौरव होणार | विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण |
| ४ | राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी ३६ वसतिगृहे | विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण |
| ५ | शाळाबाह्य मुलींसाठीच्या योजनेच्या लाभात पाचवरून साडेनऊ रूपये वाढीचा निर्णय | महिला व बाल विकास |
| ६ | नंदुरबार व वाशिम येथे मॉडेल डिग्री कॉलेज | उच्च व तंत्र शिक्षण |
| ७ | अकरा लाख कर्जधारकांना दिलासा<br>**आदिवासी शेतकरी-शेतमजुरांचे ३६१कोटींचे खावटी कर्ज माफ होणार** | आदिवासी विकास |
| ८ | छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना<br>**शेतकऱ्यांचे खावटी कर्ज माफ करण्याचा निर्णय** | सहकार |
| ९ | संबंधित अधिनियमातील तरतुदीत सुधारणा करणार<br>**म्हाडा, सिडकोच्या जमिनींवर अकृषिक कराची वाढीव दराने आकारणी न करण्याचा निर्णय** | महसूल |
| १० | प्रधानमंत्री जन आरोग्य आणि महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना राज्यात संयुक्तपणे राबविण्याचा निर्णय | सार्वजनिक आरोग्य |

## ओबीसी आणि भटक्या-विमुक्त जातींच्या विकासासाठी मंत्रिमंडळाचे विविध निर्णय

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती आर्थिक विकास महामंडळास ३०० कोटींचे तर राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास अडीचशे कोटींचे सहायक अनुदान देण्यात येणार आहे. तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या धर्तीवर वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना आणि गट कर्ज व्याज परतावा योजना या दोन्ही योजना राज्य इतर मागासवर्गीय विकास महामंडळ आणि वसंतराव नाईक विजाभज आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

या निर्णयांमुळे राज्यातील इतर मागासवर्गीय, भटक्या जमाती आणि विमुक्त जाती समुहातील समाजघटकांच्या विकासाची प्रक्रिया आता अधिक व्यापक व प्रभावी होण्यास मदत होणार आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयासोबतच महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनेची मर्यादा आता २५ हजारांहून एक लाख रुपयांपर्यंत वाढविण्यास आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. नियमित हप्ता भरणाऱ्यास बिनव्याजी कर्ज मिळणार आहे, तर थकित हप्त्यासाठी चार टक्के दराने व्याज आकारण्यात येणार आहे. या निर्णयाचा ओबीसी समुहातील तरुणांना मोठा फायदा होणार आहे.

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या १० लाखापर्यंतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची समकक्ष योजना महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ आणि वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या १० लाख ते ५० लाखापर्यंतच्या गट कर्ज व्याज परतावा योजनेची समकक्ष योजना महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ आणि वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यासाठी देखील मंजुरी देण्यात आली.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत विविध योजना राबविण्यासाठी या महामंडळास २५० कोटींचे सहाय्यक अनुदान पुढील तीन वर्षामध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या सहाय्यक अनुदानातून तीन योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली. त्यात १० लाखापर्यंतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेसाठी ५० कोटी आणि १० लाख ते ५० लाखापर्यंतच्या गट कर्ज परतावा योजनेसाठी ५० कोटी असे एकूण १०० कोटींची पहिली योजना, शामराव पेजे आर्थिक विकास या उपकंपनीमार्फत राबविण्यासाठी ५० कोटी आणि ओबीसीमधील बारा-बलूतेदार समाजाच्या परंपरागत व्यवसायाची उत्पादकता वाढविण्यासाठी त्यांना आधुनिक साहित्य व वस्तू वाटपासाठी १०० कोटी रुपयांची विशेष योजना अशा तीन योजना समाविष्ट आहेत.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती आर्थिक विकास महामंडळामार्फत विविध योजना राबविण्यासाठी या महामंडळास ३०० कोटींचे सहाय्यक अनुदान पुढील तीन वर्षामध्ये उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. या सहाय्यक अनुदानातून तीन योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली. त्यात १० लाखापर्यंतची वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेसाठी ५० कोटी आणि १० लाख ते ५० लाखपर्यंतच्या गट कर्ज परतावा योजनेसाठी ५० कोटी असे एकूण १०० कोटींची पहिली योजना,

वडार व पारधी समाजासाठी विशेष योजना आणि रामोशी समाजासह इतर अतिमागास समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी विशेष योजना अशा तीन योजनांचा समावेश आहे.

-----०-----

विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग

## इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थिनींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

राज्यातील प्राथमिक शाळा आणि इतर शैक्षणिक संस्थांमध्ये ५ वी ते १० वीत शिकणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लागू करण्यास राज्य मंत्रिमंडळाकडून आज मान्यता देण्यात आली. राज्यात २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून लागू होणाऱ्या या योजनेचा सुमारे २ लाख २० हजार विद्यार्थिनींना लाभ होणार आहे.

शाळांमधील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील ५ वी ते ७ वीतील मुलींसाठी आणि ८ वी ते १० वीतील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुलींसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. याच धर्तीवर इतर मागास प्रवर्गातील मुलींचे शाळांमधील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थिनींना दरमहा ६० प्रमाणे दहा महिन्यांसाठी ६०० रुपये शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येतील. तसेच इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थिनींना दरमहा १०० प्रमाणे दहा महिन्यांसाठी १ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. यासाठी वार्षिक १८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी उत्पन्नाची अट लागू असणार नाही.

-----०-----

विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग

## ओबीसींमधील १० वी आणि १२ वीच्या गुणवंतांचा स्व. वसंतराव नाईक पुरस्काराने गौरव होणार

राज्यातील १० वी आणि १२ वीच्या परीक्षेत राज्यातून व विभागातून सर्वप्रथम येणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थिनींना स्व. वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

सध्या राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना स्व. वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्काराने गौरविण्यात येते. याच धर्तीवर इतर मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. याअंतर्गत इतर मागास वर्गातील इयत्ता १० वी आणि १२ वी मध्ये राज्यात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनीस प्रत्येकी १ लाख, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र तर विभागातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना प्रत्येकी ५१ हजार स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

-----०-----

## राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी ३६ वसतिगृहे

राज्यात इतर मागास वर्ग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी जिल्ह्यांच्या ठिकाणी मुलांसाठी १८ आणि मुलींसाठी १८ अशी एकूण ३६ वसतिगृहे मागणीनुसार सुरू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे ओबीसी समुहातील समाजघटकांच्या शैक्षणिक प्रगतीला मोठी चालना मिळणार आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना टिकून राहणे, इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करणे तसेच आवश्यक कौशल्य व गुणवत्ता प्राप्त करून शैक्षणिक प्रगती साधता येण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वसतिगृह असणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील मुला-मुलींच्या शैक्षणिक गरजेनुसार आणि मागणीनुसार प्रत्येक जिल्ह्यात एक वसतिगृह सुरू करण्यास सुरू करण्यास तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या प्रत्येक वसतिगृहामध्ये १०० विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, शैक्षणिक साहित्य आणि आरोग्य आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. या वसतिगृहांमध्ये इतर मागास वर्ग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसह इतर प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना देखील प्रवेश दिला जाणार आहे.

आजच्या निर्णयानुसार बांधण्यात येणाऱ्या वसतिगृहांच्या इमारती केंद्र शासनाच्या बाबू जगजीवनराम छात्र आवास योजनेमधून प्राप्त होणाऱ्या सहाय्यामधून उभारण्यात येणार आहेत. या योजनेंतर्गत मुलांच्या वसतिगृहासाठी ४० टक्के आणि मुलींच्या वसतिगृहासाठी १० टक्के या प्रमाणात राज्य शासनाला द्याव्या लागणाऱ्या हिश्श्याची तरतूद करण्यासही मान्यता देण्यात आली. वसतिगृह बांधकामासह इतर अनुषंगिक कामांसाठी येणाऱ्या ५१ कोटी एवढ्या खर्चासही मंजुरी देण्यात आली. वसतिगृहासाठी आवश्यक असणाऱ्या एकूण २९३ नवीन कायम व कंत्राटी पदांना वित्त विभागाच्या उच्चाधिकार समितीकडून मान्यता घेतली जाणार आहे.

-----o-----

महिला व बाल विकास विभाग

## शाळाबाह्य मुलींसाठीच्या योजनेच्या लाभात पाचवरून साडेनऊ रूपये वाढीचा निर्णय

शाळाबाह्य मुलींच्या पूरक पोषणासाठी राज्यातील अकरा जिल्ह्यांत केंद्र पुरस्कृत SAG ( Scheme for Adolescent Girls) अर्थात किशोरवयीन मुलींसाठी सुधारित योजना राबविण्यात येणार असून या योजनेच्या लाभात प्रतिदिन पाच रूपयांवरुन साडेनऊ रूपये एवढी वाढ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. याबरोबरच या मुलींना व्यावसायिक किंवा कौशल्य प्रशिक्षण देण्याचाही निर्णय घेण्यात आला.

अकरा ते चौदा वयोगटातील शाळाबाह्य मुलींचा विकास व सक्षमीकरण करून त्यांना पोषण आहाराचा लाभ देणे, त्यांचा पोषण व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे, लाभार्थी मुलींना आरोग्य, स्वच्छता, पोषण, प्रजनन व लैंगिक आरोग्य, कुटुंब आणि बालकांची काळजी याविषयी जाणीव जागृती करणे, तसेच गृह, जीवन आणि व्यवसाय कौशल्ये उंचाविण्याकरिता मदत करण्यासह त्यांना औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण देऊन मुख्य प्रवाहात आणणे हा मुख्य उद्देश आहे. ही योजना अंगवाडी सेविकांतर्फे राबविण्यात येणार आहे. ही योजना राज्यातील बीड, नांदेड, मुंबई, नाशिक, गडचिरोली, बुलडाणा, कोल्हापूर, सातारा, अमरावती, नागपूर आणि गोंदिया या जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण-सबला योजना या केंद्र पुरस्कृत योजनेत केंद्राने काही बदल सूचविले आहेत. त्यानुसार नव्या योजनेंतर्गत लाभर्थ्यांना प्रतिदिन द्यावयाचा ३०० दिवसांचा लाभ हा पाच रूपयांवरून साडेनऊ रुपये करण्यात आली असून पूरक पोषणासाठी १६ कोटी ३० लाख रूपये व त्याव्यतिरिक्त सेवांसाठी ६ कोटी ८ लाख रूपयांचा निधी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेला उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आहाराकरिता राज्य आणि केंद्र शासन ५०-५० टक्के आपला हिस्सा देणार असून इतर सहाय्यक अनुदानाकरिता केंद्र शासन ६० तर राज्य शासन ४० टक्के आपला हिस्सा देणार आहे.

-----o-----

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## नंदुरबार व वाशिम येथे मॉडेल डिग्री कॉलेज

राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानांतर्गत (रुसा) राज्यातील नंदुरबार आणि वाशिम या दोन आकांक्षित जिल्ह्यांमध्ये नवीन शासकीय मॉडेल डिग्री महाविद्यालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांची पटनोंदणी वाढविण्यासह मागास भागाच्या शैक्षणिक विकासासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे.

उच्च शिक्षणाची संधी सर्व घटकांना प्राप्त व्हावी, ते सर्वसमावेशक व्हावे, त्यात उच्च गुणवत्ता निर्माण व्हावी यासाठी केंद्र शासनाकडून राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) कार्यक्रम राबविण्यात येत आहे. नीती आयोगाने घोषित केलेल्या देशभरातील ७० आकांक्षित जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्रातील नंदुरबार व वाशिम हे दोन जिल्हे समाविष्ट असून या दोन्ही जिल्ह्यांमध्ये रुसा अंतर्गत नवीन शासकीय मॉडेल डिग्री महाविद्यालय स्थापन करण्यास केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने यापूर्वीच मान्यता दिली आहे. त्यासाठी प्रत्येकी १२ कोटी रुपयांचे अनुदानही मंजूर केले आहे. या अनुदानामध्ये केंद्राचा हिस्सा ६० टक्के म्हणजे प्रत्येकी ७.२ कोटी तर राज्याचा हिस्सा ४० टक्के म्हणजे प्रत्येकी ४.८ कोटी राहणार आहे.

ही दोन्ही महाविद्यालये स्थापन करण्यास राज्याच्या मंत्रिमंडळानेही आज मंजुरी दिली आहे. या महाविद्यालयांसाठी राज्य शासनाने विनामूल्य जागादेखील उपलब्ध करुन दिली आहे. दोन्ही महाविद्यालयांसह वसतिगृहाच्या इमारती बांधण्यासाठी एकूण ४३ कोटी २७ लाख ३९ हजारांचा खर्च अपेक्षित असून केंद्राकडून येणारे १४ कोटी ४० लाखांचे अनुदान वगळता उर्वरित २८ कोटी ८७ लाख ३९ हजार खर्चाचा अतिरिक्त भार राज्य शासनाकडून उचलण्यात येणार आहे. तसेच प्रत्येकी ४४ शिक्षक, १२ प्रशासकीय कर्मचारी व बाह्य स्त्रोताद्वारे भरण्यासाठी गट ड वर्गातील ३६ कर्मचारी अशा दोन्ही महाविद्यालयांसाठी मिळून १८४ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी वार्षिक खर्च सुमारे ८ कोटी २२ लाख इतका येणार आहे.

-----o-----

अकरा लाख कर्जधारकांना दिलासा

## आदिवासी शेतकरी-शेतमजुरांचे
## ३६१कोटींचे खावटी कर्ज माफ होणार

आदिवासी अल्पभूधारक शेतकरी आणि शेतमजुरांना आदिवासी विकास महामंडळाकडून खावटी कर्जापोटी देण्यात आलेले २४४.६०कोटींचे कर्ज आणि त्यावरील ११६.५७ कोटींचे व्याज अशा एकूण ३६१ कोटी १७ लाख रुपयांची रक्कम माफ करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली .२००९ ते २०१४या कालावधीत कर्ज घेतलेल्या ११ लाख २५ हजार ९०७ शेतकरी-शेतमजुरांना या निर्णयाचा लाभ होणार आहे.

आदिवासी अल्पभूधारक शेतकरी व शेतमजूर हे अत्यंत दुर्गम भागातील असल्याने त्यांच्यासाठी हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. त्यांचे जुने कर्ज माफ झाल्याने आता त्यांना नवीन कर्जाचा लाभ घेता येणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत खावटी कर्ज घेतलेल्या सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी आदिवासी शेतकरी आणि शेतमजुरांचे खावटी कर्ज माफ करण्याबाबत चर्चा झाली. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अल्पभूधारक व शेतमजूर यांना पावसाळ्यात रोजगार उपलब्ध होत नसल्याने आर्थिक अडचणीमुळे त्यांची उपासमार होऊ नये यासाठी खावटी कर्ज देण्यात येते. आदिवासी विकास महामंडळाने २००९ ते २०१४ या कालावधीत २४४ कोटी ६० लाख रुपयांचे कर्ज वाटप केले. या कर्जासह त्यावरील ११६ कोटी ५७ लाख रुपयांचे व्याज थकित आहे.

आदिवासी उपयोजनेंतर्गत १९-२०१८या आर्थिक वर्षात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेसाठी ९४० कोटी इतकी तरतूद उपलब्ध आहे .या तरतुदीतून ३६१ कोटी १७ लाख इतकी रक्कम खावटी कर्ज माफीचा खर्च भागविण्यास आदिवासी विकास महामंडळास कर्जाची परतफेड म्हणून उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.

-----o-----

सहकार विभाग

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना

## शेतकऱ्यांचे खावटी कर्ज माफ करण्याचा निर्णय

राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत आता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत दिलेल्या खावटी कर्जाचा समावेश करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील ११ हजार ३९० शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी येणाऱ्या अंदाजे २४ कोटी ४ लाख रुपयांच्या खर्चासही मंजुरी देण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेमध्ये शेती कर्जाचा (पीक कर्ज व मध्यम मुदत कर्ज) समावेश करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना शेती कर्जाव्यतिरिक्त घरगुती गरजा भागविण्यासाठी देण्यात येणाऱ्या अल्प रकमेच्या तसेच अल्प मुदतीच्या कर्जास खावटी कर्ज म्हणतात. नाबार्डच्या परिपत्रकानुसार कापणीपश्चात किंवा घरगुती आवश्यकतेसाठी लागवडीखालील क्षेत्रातील पीक कर्ज क्षमतेच्या १० टक्क्यांच्या मर्यादेपर्यंत कर्ज देण्यात येते. व्यापारी बँका पीक कर्जाचे वाटप किसान क्रेडिट कार्डमार्फत करतात. अशा किसान क्रेडीट कार्डच्या पीक कर्जामध्ये खावटी कर्जाचा देखील समावेश असतो. त्यामुळे व्यापारी बँका शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपानंतर वेगळ्याने खावटी कर्ज या नावाने कर्ज वाटप करत नाहीत. मात्र, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या पीक कर्जामध्ये खावटी कर्जाचा समावेश नसतो. त्यामुळे शेतकऱ्यांना पीक कर्जाशिवाय खावटी कर्ज वितरित करावयाचे असल्यास जिल्हा मध्यवर्ती

सहकारी बँका आपल्या पोटनियमामध्ये तशी तरतूद करून घेतात. त्यानुसार सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी पोटनियमांत बदल करून अल्प मुदतीचे खावटी कर्ज दिलेले आहे. खावटी कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांनाही दिलासा देण्यासाठी ३१ जुलै २०१७ पर्यंतच्या कर्जाचा समावेश छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ मध्ये करण्याचा निर्णय आज घेण्यात आला.

-----०-----

महसूल विभाग

<u>संबंधित अधिनियमातील तरतुदीत सुधारणा करणार</u>

## म्हाडा, सिडकोच्या जमिनींवर अकृषिक कराची वाढीव दराने आकारणी न करण्याचा निर्णय

म्हाडा किंवा सिडकोने धारण केलेल्या किंवा त्यांनी भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींवर वाढीव दराने अकृषिक कराची आकारणी करण्यात येऊ नये, अशी सुधारणा संबंधित अधिनियमामध्ये करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निर्णयाचा लाभ सिडको आणि म्हाडातील विकसित वसाहतींतील मालमत्ताधारकांना होणार आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल व विशेष आकारणीमध्ये वाढ करण्याबाबत अधिनियम-१९७४ च्या कलम ३ अन्वये जमीन महसुलात वाढ करणे आणि ती वसूल करण्याबाबत (Levy and collection of increase in land revenue) तरतूद आहे. त्यानुसार ८ हेक्टर्सपेक्षा जास्त आणि १२ हेक्टर्सपेक्षा कमी क्षेत्राच्या जमिनींसंदर्भात देय जमीन महसुलाच्या ५० टक्के वाढीव दराने महसूल आकारण्याची तरतूद आहे. तसेच १२ हेक्टर्सपेक्षा जास्त क्षेत्राच्या जमिनींसंदर्भात देय जमीन महसुलाच्या १०० टक्के वाढीव दराने महसूल आकारण्याची तरतूद आहे.

राज्यामध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) तसेच शहर व औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO) या महाराष्ट्र शासन अंगीकृत संस्थांच्या अनेक ठिकाणी वसाहती आहेत. या वसाहतींमधील जमिनीवरील प्लॉट रहिवाशांना, सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्ट्याने देण्यात आले आहेत. त्यांची मालकी म्हाडा किंवा सिडकोकडेच आहे. या जागांचे क्षेत्र ८ हेक्टर्सपेक्षा जास्त असेल तर, संबंधित अधिनियमाच्या कलम ३ मधील तरतुदींनुसार अशा क्षेत्रांवर वाढीव दराने अकृषिक दराची आकारणी लागू होते. त्यामुळे, रहिवाशांचे तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थांचे वैयक्तिक क्षेत्र हे ८ हेक्टर्सपेक्षा कमी असले तरी या क्षेत्रावर संबंधित अधिनियमाच्या कलम ३ मधील तरतुदींनुसार वाढीव दराने अकृषिक दराची आकारणी करुन त्याची वसुली केली जाते.

या पार्श्वभूमीवर म्हाडा किंवा सिडको यांनी रहिवाशी किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्ट्याने भूखंड दिलेला असेल अथवा म्हाडा किंवा सिडकोने धारण केलेल्या एकूण जमिनीच्या क्षेत्रावर संबंधित अधिनियमाच्या कलम ३ मधील तरतुदींनुसार वाढीव दराने अकृषिक कराची आकारणी करण्यात येऊ नये, या आशयाची तरतूद संबंधित अधिनियमात करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

----०----

## प्रधानमंत्री जन आरोग्य आणि महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना राज्यात संयुक्तपणे राबविण्याचा निर्णय

राज्यातील जास्तीत जास्त नागरिकांना आरोग्य सेवांचा लाभ मिळावा यासाठी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना संयुक्त पद्धतीने राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. ही योजना विमा (Insurance) आणि हमी (Assurance mode) तत्त्वावर राबविण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री जन आरोग्य आणि महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना संयुक्तपणे राबविल्यामुळे लाभार्थ्यांना एकूण १२०९ वैद्यकीय उपचारांचा तसेच १८३ पाठपुरावा सेवांचा लाभ मिळणार आहे. शासकीय व खासगी अशा रूग्णालयांतून या दोन्ही योजना राबविण्यात येणार असून लाभार्थ्यांच्या उपचारांचे दीड लाखापर्यंतचे दावे विमा कंपनीतर्फे देण्यात येतील तर त्यावरील पाच लाखापर्यंतचे दावे राज्य आरोग्य हमी सोसायटीतर्फे संबंधित रूग्णालयांना देण्यात येतील.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत पाच लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यात येते. त्याचा लाभ राज्यातील सुमारे ८३ लाख ७२ हजार कुटुंबास (ग्रामीण-५८.९१ आणि शहरी २४.८१) मिळणार आहे. तसेच महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत साधारणत: दीड लाख रुपये आणि मुत्रपिंड उपचारासाठी २ लाख ५० हजारापर्यंत विमा संरक्षण मिळते. या योजनेत अंत्योदय, पिवळी, अन्नपुर्णा, केशरी शिधापत्रिका असलेल्या लाभार्थी कुटुंबांव्यतिरिक्त अवर्षणग्रस्त १४ जिल्ह्यांतील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंब, तसेच शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी, शासकीय महिला आश्रमांतील महिला, शासकीय वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडील निकषानुसार पत्रकारांचा व त्यांच्या कुटुंबांचा आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणी असलेल्या बांधकाम कामगारांचा समावेश असणार आहे. या योजनेचा सुमारे १ कोटी ३९ लाख कुटुंबास लाभ मिळेल.

या योजनांसाठी सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील विमा कंपन्यांना निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार असले तरी सार्वजनिक कंपन्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी महसूल विभागनिहाय रूग्णालयांची संख्या निश्चित करून एकसमान पद्धतीने रुग्णालयांचे जाळे तयार करण्याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांना देण्यात आले आहेत. त्यासोबतच उपचारांची संख्या, वर्णनात व दरांत बदल करण्याचे व काही उपचार शासकीय रूग्णालयांसाठी राखीव ठेवण्याचेही अधिकार देण्यात आले आहेत.

या योजना एकत्रितपणे राबविण्यासाठी विमा कंपनीची निवड करण्याचे अधिकार १६ सप्टेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार वित्त विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीला देण्यात आले आहेत. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य सनियंत्रण व कार्यकारी समिती तसेच राज्य स्तरावर समन्वय, अंगीकरण व शिस्तपालन समिती, अंतिम दावे निराकरण समिती, राज्य तक्रार निवारण समिती व जिल्हास्तरावर जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समिती अशा समित्यांची निर्मिती करण्यात येणार आहे.

----o----